सांगली - कोल्हापूर - मुंबई

नवे विचार...नवी सुरुवात

■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ८१ ■ बुधवार, २५ जून २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




## संक्षिप्त...

### पंचगंगेचे पाणी पात्राबाहेर २४ बंधारे पाण्याखाली

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

यंदाच्या पावसाळ्यामध्ये पंचगंगा नदी आज (दि.२४) पहिल्यांदाच पात्राबाहेर पडली आहे. कोल्हापूर शहरात पावसाचा जोर कमी असला तरी धरण क्षेत्र आणि घाटमाथ्यांवर जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे पंचगंगा नदी पाणी पातळीत वेगाने वाढ असून सध्या ती २९.११ फुटांवर वाहत आहे.

### 'गोकुळ' २५ सदस्य करण्याच्या हालचाली

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

'गोकुळ' च्या पंचवार्षिक निवडणुकीला अद्याप वर्षभराचा कालावधी असला तरीही निवडणुकीचे पडघम आतापासूनच वाजू लागले आहेत. सत्तारूढकडून पॅनेल बांधणी मजबूत करण्यासाठी किंवा ही निवडणूक एकतर्फी करण्यासाठी संचालक मंडळाची सदस्य संख्या २१ वरून २५ करण्याच्या हालचाली सुरू आहेत.

### आषाढीसाठी २३ कोटींचा निधी

**सोलापूर : हॅलो प्रभात**

आषाढी वारीत वारकऱ्यांना आवश्यक सुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून आतापर्यंत १५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. याशिवाय जिल्हा नियोजन समितीतून ८ कोटी रुपयांचा निधीही उपलब्ध होत असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी दिली.

### डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांना अभिवादन

**मिरज : हॅलो प्रभात**

थोर विचारवंत डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या स्मृतीदिना निमित्त मिरज शहर भाजपच्या वतीने आमदार डॉ.सुरेश खाडे यांच्या जनसंपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले.

## हे तर राहुल गांधींच्या नैराश्याचे प्रदर्शन

### देवेंद्र फडणवीस यांचा प्रहार

**मुंबई : हॅलो प्रभात**





महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीत झालेल्या दारुण पराभवामुळे नैराश्यग्रस्त झालेल्या राहुल गांधी यांनी तर्कहीन दावे करून, महाराष्ट्रातील पराभवाचे खापर मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीवर फोडण्याआधी याच वाढीव टक्केवारीमुळे विजयी झालेल्या काँग्रेस उमेदवारांकडून वास्तव जाणून घेतले असते

तर हवेत तीर मारण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती, असा टोला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगावला आहे. विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या वाढीव टक्केवारीबाबत निवडणूक आयोगाकडून स्पष्ट खुलासा झालेला असताना काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी

पुन्हा एकदा पराभवाच्या नैराश्यातून तीच संशयाची राळ उडवली आहे, पण मालाड मतदारसंघात ११ टक्के (३८६२५) मतदार वाढले. तेथे विजयी झालेले अस्लम शेख, पश्चिम नागपूर मतदारसंघात ७ टक्के (२७०६५) मतदार वाढले, तेथे विजयी झालेले विकास ठाकरे, उत्तर नागपूरमध्ये ७ टक्के वाढ झाली,

तेथे काँग्रेसचेच नितीन राऊत विजयी झाले, तर पुणे जिल्ह्यातील वडगाव शेरी मतदारसंघात १० टक्के (५०९११) मतदार वाढले व तेथे शरद पवार गटाचे बापूसाहेब पठारे विजयी झाले. मुंब्रा मतदारसंघात ९ टक्के मतदार वाढले, तेथेही शरद पवार गटाचे जितेंद्र आव्हाड विजयी झाले.

या निकालाची स्वपक्षीयांकडून माहिती घेतली असती तर अशी निरर्थक निशाणबाजी करण्याची वेळ राहुल गांधी यांच्यावर आली नसती, असे प्रत्युत्तर फडणवीस यांनी दिले आहे.

## कोल्हापुरात एकनाथ शिंदेंची 'जादू'

### माजी महापौरासह २० नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई : हॅलो प्रभात**



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापुरात एकाच वेळी काँग्रेसचे सतेज पाटील, भाजप आणि ताराराणी आघाडीला धक्का दिला आहे. या तीनही गटातील दोन माजी महापौर आणि २० नगरसेवकांनी शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केला. एकनाथ शिंदे आणि कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या उपस्थितीत या सर्वांनी मुंबईत हा पक्षप्रवेश केला.

गेल्या काही दिवसांपासून एकनाथ शिंदेंनी कोल्हापूरवर लक्ष केंद्रीत केलं असून अनेक मोठ्या नेत्यांना गळाला लावलं आहे. आधी काँग्रेसचे नेते सतेज पाटील यांचे कट्टर समर्थन शारंगधर देशमुखांना त्यांनी फोडलं. त्यानंतर आता तब्बल २० नगरसेवकांना पक्षात घेतलं आहे. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत काँग्रेस तसेच भाजपसमोर शिंदेंचं मोठं आव्हान असणार आहे. महापालिका निवडणूक तोंडावर आली असताना शिंदेंनी काँग्रेसचे प्रमुख मोहरे फोडल्याने तो सतेज पाटलांना मोठा धक्का असल्याचं बोललं जात आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातच ८ टक्के मतदार वाढ कशी ?

### हर्षवर्धन सपकाळ ; मतचोरी लपवण्यासाठीच फुटेज डिलीट करण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय

**मुंबई : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतांची चोरी करून भाजपा युती सत्तेत आल्याचे पुरावे दररोज समोर येत आहेत. राहुलजी गांधी यांनी सातत्याने या मतचोरीचे प्रकरण लावून धरले आहे. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळेंच्या कामठी मतदारसंघातील मतांचा घोळ उघड केल्यानंतर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण मतदारसंघात ५ महिन्यात ८ टक्के मतदार वाढल्याचे उघड झाले आहे. भाजपाची मतचोरी पकडली गेल्याने देवेंद्र फडणवीसांनी नैतिक जबाबदारी स्विकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे. पुढे सपकाळ म्हणाले की, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघातील मतदारयादीत अवघ्या ५ महिन्यांत ८% वाढ झाली आहे, काही बूथवर ही वाढ २०-५०% झालेली दिसत आहे. अज्ञात व्यक्तींनी मतदान केल्याचे बीएलओंनी नोंदवले आहे पण निवडणूक आयोग मात्र गप्प असून ही मतचोरीच आहे म्हणूनच काँग्रेस पक्षाने मशीन-रीडेबल डिजिटल मतदार यादी आणि सीसीटीव्ही फुटेज प्रसिद्ध करण्याची मागणी केलेली आहे.

## मिरज रेल्वे जंक्शनबाबत दुजाभाव का ?

### विशाल पाटील आक्रमक ; पुण्यात रेल्वेची बैठक, गैरसोयींच्या प्रश्नावर विचारला जाब

**सांगली : हॅलो प्रभात**



मिरज रेल्वे जंक्शन पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्वाचे केंद्र आहे, मात्र या ठिकाणी अत्याधुनिक सोयी सुविधा देण्यात रेल्वेने नेहमी आखडता हात घेतला आहे. त्याचा तातडीने विचार करावा आणि जंक्शन विकासासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी आग्रही मागणी खासदार विशाल पाटील यांनी आज पुण्यात आयोजित पुणे, सोलापूर मंडलमधील खासदारांसोबत झालेल्या रेल्वे प्रशासनाच्या बैठकीत केली.

रेल्वेचे विविध प्रश्न समजून घेणे आणि त्याची सोडवणूक करण्यासाठी कृती आराखडा बनवण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. खासदार सुप्रिया सुळे, ओमराजे निंबाळकर, धैर्यशील मोहिते, डॉ. शिवाजी काळगे, रजनी पाटील, नितीन पाटील, मेधा कुलकर्णी, भाऊसाहेब वाघचौरे, निलेश लंके, डॉ. अमोल कोल्डे, श्रीरंग बारणे आदींची प्रमुख उपस्थिती होती. खासदार विशाल पाटील यांनी सांगली जिल्ह्यातील रेल्वेशी निगडीत विविध प्रश्नांवर आक्रमक भूमिका मांडली. विशेषतः मिरज जंक्शनबाबत त्यांनी 'टू द पॉईट' चर्चा केली.

ते म्हणाले, 'मिरज रेल्वे जंक्शनवर फलाट क्रमांक एक वगळता २, ३, ४, ५, ६ या ठिकाणी प्रवाशांसाठी निवारा शेड अपुरे आहेत. पावसाळ्यात प्रवाशांची मोठी गैरसोय होते. सरकता जिना नाही. प्रवाशांना ओझ्या बॅग घेऊन जाणे अडचणीचे होते. फक्त एक, तीन, चार क्रमांकाच्या फलाटावर लिफ्ट आहेत. अन्यत्र त्या बसवायला हव्यात. पॅसेंजर जाग्डाय फलाक ५, ४ व २ या ठिकाणी उभ्या केल्याने दिव्यांग व ज्येष्ठ प्रवाशांचे हाल होतात. पार्किंगचा प्रश्न कित्येक वर्षांपासून तसाच आहे. पिण्याचे स्वच्छ पाणी नाही. फर्स्ट क्लालसाठी वेटिंग रुमचा अभाव आहे. स्वच्छतेचा बोजवारा असतो. पिटलाईनचे काम अद्याप पूर्ण नाही. जंक्शनमधील मॉलचे काय झाले कळत नाही. विशेष गाड्या सोडण्याबाबत नेहमी उदासिनता दाखवली जाते. चाईल्ड हेल्पलाईनला अपुरी जागा आहे. या परिस्थिती बदल होणार आहे की नाही?'

पुढे ते म्हणाले, मिरज मॉडेल स्थानकाचे काम लवकर सुरु करावे. सांगली-परळी एक्स्प्रेस डेमूऐवजी आयसीएफ डब्याची सोडावी. भिलवडी स्थानकावरील एफओबी ताबडतोब बांधण्यात याव. ताकारी रेल्वे स्थानकास महाराष्ट्र एक्स्प्रेस आणि कोयना एक्स्प्रेसचा थांबा द्यावा. मिरजम धून बेळगाव, लोंडा, कॅसलरॉक, हुबळीसाठी पॅसेंजर धावतात. त्या धर्तीवर पंढरपूर, कुर्डुवाडी, सातार पॅसेंटर गाड्या सुरु कराव्यात.

## 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाची सायकल वारी उत्साहात

### एकाच दिवसात पार केले लोणी-काळभोर ते पंढरपूर अंतर

**पुणे : हॅलो प्रभात**



ज्ञानोबा-तुकोबाचा गजर, एकमेकांना माऊली... माऊली या नावाने मारलेली हाक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मुलींचा उत्फुर्त प्रतिसाद अशा वातावरणात सलग चौथ्या वर्षी येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ (एमआयटी एडीटी), पुणे तर्फे सायकल वारी हा उपक्रम मोठ्या उत्साहात पार पडला.

एमआयटी एडीटी विद्यापीठाने सायकल वारीच्या माध्यमातून भक्तिभाव, पर्यावरणाची जाणीव आणि सामाजिक संदेशाचा संगम साधताना लोणी-काळभोर येथून ३५ सायकलस्वारांच्या चमूसह पंढरपूरच्या दिशेने प्रस्थान करताना अवघ्या एका दिवसात २२० किमीचे हे अंतर पार केले. सायकल स्वारांच्या या चमूने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाने प्रवास करत विद्यापीठात राष्ट्रीय रोइंग प्रशिक्षक संदीप भापकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही वारी मोठ्या उत्साहात पूर्ण केली.

या सायकल वारीला एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस, प्र-कुलगुरू डॉ. रामचंद्र पुजेरी, डॉ. मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे, विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. सुराज भोयर यांनी हिरवा झेंडा दाखवून शुभेच्छा दिल्या आणि सर्व सहभागी सायकलस्वारांचे अभिनंदन केले.

वारीमध्ये सहभागी सायकलस्वारांनी 'नशा मुक्त भारत', 'विश्वशांती' आणि 'स्वस्थ जीवनशैली' यांचे संदेश देत, शिस्तबद्धतेसह हेल्मेट,

हाय व्हिजिबिलिटी जॅकेट्स, मेडिकल सपोर्ट याची विशेष काळजी घेत ही सायकल वारी सलग चौथ्यांदा निर्विघ्न पार पाडली.

## खरसुंडी जि.प.गटात भाजप-शिवसेना आमने-सामने ?

### रणधुमाळी 'स्थानिक'ची : इच्छुकांचे गुडघ्यास बाशिंग



**सांगली : विशेष प्रतिनिधी**

**जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी वातावरण चांगलेच तापले आहे. 'स्वबळ' की आघाडी याचा निर्णय झालेला नसतानाच इच्छुक गुडघ्यास बाशिंग बांधून तयारीत आहेत. आटपाडी तालुक्यातील खरसुंडी गटात महायुतीचे घटक पक्ष भाजप आणि शिवसेनेतच होण्याची शक्यता असली तरी काँग्रेसची या भागात ताकद आहे, असे राजकीय जाणकारांमधून व्यक्त केले जात आहे. तथापि आरक्षण कसे पडते त्यावर बरेचसे अवलंबून आहे.**

आटपाडी तालुक्याच्या पश्चिम भागातील खरसुंडी जिल्हा परिषद गटात सत्ताधारी महायुतीच्या घटक पक्षांतच निवडणूक रंगणार आहे. स्थानिक गाव पातळीवर पक्षाचा अजेंडा न बघता कोणत्याही उमेदवारास पाठिंबा दिला जातो आणि त्याचे काम करण्यात येते. यावेळी देखील तसेच घडण्याची शक्यता आहे.

कित्येक वर्षे खरसुंडी जिल्हा परिषद गटावर काँग्रेसचे दिवंगत लोकनेते मोहनकाका भोसले यांचे वर्चस्व होते. त्यांच्या निधनानंतर भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर व माजी समाजकल्याण सभापती ब्रह्मानंद पडळकर यांनी या गटात आपली ताकद वाढवली. याचा प्रत्यय गतवर्षीच्या निवडणुकीत दिसून आला. गत निवडणुकीत त्यांचे वारस व तालुका काँग्रेसचे अध्यक्ष जयदीप भोसले यांनी उमेदवारी दाखल केली.

मात्र, त्यांना पराभवास सामोरे जावे लागले. तरीपण खरसुंडी गणात पंचायत समिती सदस्या सारिका भिसे यांना निवडून आणण्यात भोसले यांना यश आले. काँग्रेसचे वर्चस्व खरसुंडी गटात अजूनही टिकून आहे. घरनिकी गणात भाजपच्या पडळकर बंधूनी वर्चस्व टिकवले आहे. तालुक्यात सध्या भाजपचे वर्चस्व आहे.

माजी आमदार राजेंद्रअण्णा देशमुख यांनी भाजप सोडून राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केला. राष्ट्रवादीचे वैभव पाटील यांनी राष्ट्रवादी सोडून भाजपमध्ये याच आठवड्यात प्रवेश केला. या प्रवेशामुळे मतदार व कार्यकर्ते विखुरले गेले आहेत. तालुक्यात शिवसेना शिंदे गटाचे आमदार सुहास बाबर व त्यांचे खंदे समर्थक आणि जिल्हा बँकेचे संचालक तानाजीराव पाटील यांनी चांगलीच टीम वर्क आहे. आमदार बाबर यांनी प्रत्येक गावात विकासकामे केल्याने त्यांचा गट अबाधीत आहे. खरसुंडी जिल्हा परिषद गटात शिवसेनेचे चांगलेच नेटवर्क आहे. काँग्रेसचे जयदीप भोसले यांनी सुहास बाबर यांना विधानसभा निवडणुकीत पाठिंबा दिला होता. त्यामुळे या जिल्हा परिषद गटात काँग्रेस व शिवसेनेची ताकद जास्त आहे. जिल्हा परिषद निवडणुकीत शिवसेना शिंदे गट व काँग्रेस विचारांचा उमेदवार आणि भाजप पक्षाकडून पडळकर बंधू इच्छुक उमेदवार आहेत. सध्या इच्छुकांमध्ये काँग्रेस पक्षाचे जयदीप भोसले,




शिवसेनेचे चंद्रकांत भोसले, साहेबराव चवरे व मदन कातुरे तर भाजपतर्फे ब्रह्मानंद पडळकर, पक्षाचे जिल्हा संघटन महामंत्री व सरचिटणीस विलास काळेबाग व कैलास वाघमारे आहे. आरक्षण काय पडते याचे ठोकळे बांधून सध्या चाचणी उमेदवाराची करण्यात येत आहे. यामध्ये माजी आमदार देशमुख व माजी आमदार सदाशिव पाटील, वैभव पाटील स्थानिक पातळीवर कुणास मदत करणार हे निर्णायक ठरू शकते.

वैभव पाटील भाजपात गेल्याने भाजप आणि आ. सुहास बाबर यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेची आटपाडी तालुक्यातील ताकद स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दिसून येणार आहे.

# संपादकीय

## ग्राहकांनो स्मार्ट व्हाच ..!

आत्ताच्या डिजिटल युगात ग्राहक सेवा देणाऱ्या एआय प्रणाली वाढत असल्या तरी ग्राहकांच्या अडचणी वाढत आहेत. चॅटबॉट्स, अलेक्सा यांसारख्या स्मार्ट उपकरणांमुळे सेवेचा अनुभव अवघड झाला आहे. तांत्रिक अडचणी, सेवा रद्द न होणे, चुकीच्या ऑर्डर्स यामुळे ग्राहक त्रस्त होतात. त्यामुळे स्मार्ट उपकरणांचा योग्य उपयोग करण्यासाठी ग्राहकांनीही अधिक सजग, सावध आणि 'स्मार्ट' व्हायला हवेच.

अंदाजे दोन-तीन वर्षांपूर्वी विनोदाने ग्राहक समस्या मांडणारा एक संवाद समाजमाध्यमांवर फिरत होता. शंभरऐवजी चुकून दहा हजार लाडूंची मागणी नोंदवली गेली होती. कारण काय, तर नवीन फोनमधील शून्य आकडा जास्त वेळ दाबला गेला आणि म्हणून शून्यांची संख्या वाढली. पुढची समस्या अशी की, ही मागणी दुरुस्त किंवा रद्द करण्याची काहीच सोय सापडत नव्हती, कारण ती नव्हतीच! मग काय, चतुर ग्राहकाने पुढे पत्ता-बित्ता दिलाच नाही. पत्ता विचारायला फोन आलाच, चक्क दहा हजार लाडू होते ना! त्यावेळी, आम्ही सहा भाऊ आहोत, मी तर ही मागणी नोंदवलीच नाही. मी पाच नंबरचा भाऊ आहे, तुम्ही उरलेल्या बंधुराजांशी संपर्क करा. मोठ्या भावासाठी एक दाबा. असे उत्तर पत्ता विचारणाऱ्या माणसाला दिले.

यातील विनोदाचा भाग वगळला, तर आज परिस्थिती आणखीच बिकट होत आहे. ग्राहक सेवा देणारे तंत्रज्ञान पुरवणाऱ्या कंपन्या मेवा खात आहेत आणि ग्राहक? चॅटबॉट, एआय बॉट यांच्या नावाने बोटे मोडण्यापलीकडे काही करू शकत नाहीत. ठराविक प्रश्न किंवा समस्या यासाठी या एआय सेवकांकडे माहिती भरून ठेवलेली असते. अनेक सेवा पुरवठादार व्हॉट्सॲपद्वारे ही सेवा देतात. काही उत्पादक/पुरवठादार/बँकांच्या ॲप/संकेतस्थळावरून कुठलेतरी नाव धारण करणारी सेविका आपल्या चौकशींना उत्तरे देते. पण 'मी हे उत्तर देऊ शकत नाही', असे उत्तर तिला देता येत नाही. ती परत परत आपल्यालाच 'प्रश्न नीट विचार', असे सांगत राहते. ज्या प्रश्नांची/तक्रारीची उत्तरे त्या सेविकेस देणे शक्य नाही, त्यासाठी 'आमच्या ग्राहक तक्रार अधिकाऱ्याशी संपर्क करायला नऊ/शून्य दाबा', अशी सोय तिथे नसते.

या बाबतीतला एक अनुभव-आजकाल डीटीएच सेवा घेणारे ग्राहक सहसा ज्येष्ठ नागरिक असतात. या सेवेत बदल करण्यासाठी, त्याचेही शुल्क भरण्यासाठी व्हॉट्सॲप खाते असते. एका काकूंनी महत्प्रयासाने या ॲपद्वारे एक महिन्यासाठी नेटफ्लिक्स कसे घ्यायचे ते शोधून काढले आणि 'येस' म्हणून ते घेतले. काहीतरी नवीन शिकून काहीतरी वेगळे करून बघूया, याचा आनंद अर्थातच मोठा होता. आता त्या नेटफ्लिक्सचे लॉग इन बनवणे, पासवर्ड बनवणे याच्याशी झटापट सुरू झाली. त्यांनी अनेक प्रयत्न करून ते साधले नाही. कुणाला विचारले, तर जे सांगितले ते कसे करायचे हेही उलगडेना. आता त्या परत ॲप उघडून जे सगळे केले ते 'अनडू' करण्याचा प्रयत्न करू लागल्या. सुदैवाने मानवी आवाजाशी संपर्क झाला. पण 'आम्ही काही करू शकत नाही, तुम्ही नेटफ्लिक्सशी संपर्क करा', याच्या पलीकडे उत्तर मिळाले नाही.

काकूंचा मुद्दा असा होता की, मी डीटीएच कंपनीची ग्राहक आहे. माझे पैसे तुमच्या कंपनीने स्वीकारलेत, तर मला तुम्ही मदत केली पाहिजे. पण 'ते शक्य नाही', असेच सांगितले गेले. 'मला ही सेवा रद्द करायची आहे. ती कशी करायची?' याचे उत्तर कुठेच सापडेना. अखेरीस थेट डीटीएचच्या ग्राहक सेवा अधिकाऱ्याचा ई-मेल पत्ता मिळवून, पुढच्या महिन्याचे पैसे कापले जाण्याआधी त्यांनी आपली नेटफ्लिक्सची मागणी रद्द करून घेतली. एक महिन्याचे पैसे वाया गेले.

ऑनलाइन खरेदीबाबत गोष्ट अशी की, ज्यावेळी पैसे भरायचे असतात, त्यावेळी ही ॲप्स अगदी सुरळीत चालतात. मात्र परतावा पुढच्या खरेदीसाठी स्वतःकडेच ठेवून घेतात. मुळात सेवा घेण्यासाठी/खरेदी करण्यासाठी ग्राहकाला अगणित ॲप्स, त्यांचे पासवर्ड असे सगळे सांभाळावे लागते. वेळोवेळी पासवर्ड बदलावे लागतात. अर्थात हे ग्राहकाच्या सुरक्षिततेसाठी असते. पण त्यासाठी जी माहिती मागितली जाते, ती कितपत खासगी राहते याविषयी शंका राहतेच.

# मायकल जॅक्सनची १५० वर्ष जगण्याची इच्छा होती; पण ५० व्या वर्षीच मृत्यू?








२५ जून : पुण्यतिथी

**हॅलो प्रभात**

लॉस एंजेलिसचा एक सर्वसामान्य दिवस होता २५ जून २००९. दुपारी २:२६ च्या सुमारास टीव्ही चॅनल, वेबसाइटवर बातमी आली की किंग ऑफ पॉप मायकल जॅक्सन यांचं निधन झालंय. बातमी कळताच सर्वत्र स्तब्धता पसरली. अनेक लोक रस्त्यावर बेशुद्ध होऊ लागले आणि संपूर्ण लॉस एंजेलिसमध्ये एकच गोंधळ सुरू झाला. काही मिनिटांत गुगल, ट्विटर, विकिपीडिया यूजर ट्रॅफिकमुळे क्रॅश झाले. १५० वर्ष जगण्याची इच्छा असलेला मायकलचा वयाच्या ५०व्या वर्षी कसा काय मृत्यू झाला हे सगळ्यांना जाणून घ्यायचं होतं.

### १२ वैयक्तिक डॉक्टरांची वैयक्तिक एक टीम

२५ जून २००९ रोजी दुपारी १२ वाजता मायकल जॅक्सनचा मृत्यू झाला. प्रोपोफोल आणि बेंझोडायझेपाइन यांसारख्या जड औषधांच्या ओव्हरडोजमुळे त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. त्याला १५० वर्षांहून अधिक जगायचे होते, त्यासाठी त्यानं १२ डॉक्टरांची एक टीम त्याच्या घरी ठेवली होती. मायकलच्या अन्नाचीही प्रयोगशाळेत प्रथम चाचणी करण्यात यायची आणि नंतर तो ते खात असे.

### मृत्यूच्या वेळी काय घडलं?

त्याच्या मृत्यूच्या वेळी, त्याचे वैयक्तिक डॉक्टर कॉनरॅड मरे त्याच्यासोबत लॉस एंजेलिसच्या घरात होते. मायकलला जेव्हा झोप येत नव्हती तेव्हा त्याला अनेक औषधांचे डोस देण्यात आले होते, जेणेकरून तो लवकर झोपू शकेल. काही वेळाने डॉक्टरांनी मायकलला खोलीत बेशुद्ध अवस्थेत पडलेलं पाहिलं आणि त्याला तातडीने सीपीआर दिला. प्रतिसाद न मिळाल्याने डॉक्टरांनी वैद्यकीय मदत घेण्यासाठी घरात लँडलाईन आणि मोबाईलवर फोन लावले, मात्र सुरक्षेमुळे घरातील सर्व लँडलाईन बंद होते.

### दोन तासांच्या प्रयत्नानंतर मृत घोषित करण्यात आले

त्यांनी ताबडतोब घराबाहेर धाव घेतली आणि गार्डला ९११ वर कॉल करायला सांगितलं. ठीक १२.२२ वाजता वैद्यकीय हेल्पलाइन क्रमांक ९११ वर कॉल करण्यात आला. अवघ्या ३ मिनिटात डॉक्टरांसह रुग्णवाहिका पोहोचली. डॉक्टर आले तेव्हा मायकलचा श्वास थांबला होता. त्याला सीपीआर देण्यात आला, पण त्याचा काही उपयोग झाला नाही. त्याला ताबडतोब रोनाल्ड रेगन यूसीएलए मेडिकल सेंटरमध्ये नेण्यात आले. सुमारे दोन तासांच्या प्रयत्नानंतर दुपारी २.२६ वाजता त्याला मृत घोषित करण्यात आलं.

### मृत्यूचं कारण संशयास्पद; ३९ दिवसांनी अंत्यसंस्कार

संशयास्पद परिस्थितीत मृत्यूचं नेमकं कारण शोधण्यासाठी पोलिस आणि डॉक्टरांना अनेक महिने लागले. मायकलचा मेंदू काढून पोस्टमॉर्टमसाठी तपासण्यात आला. कुटुंबियांना अंत्यसंस्कार करायचे होते, परंतु २ महिने कोणताही निकाल लागला नाही. अशा परिस्थितीत कुटुंबियांना मायकलचा मृतदेह दफन करण्याची इच्छा होती. मात्र, लोकांनी समजावल्यानंतर कुटुंबियांनीही वाट पाहण्यास होकार दिला. शेवटी मायकल जॅक्सनचे खाजगी अंत्यसंस्कार ३ सप्टेंबर २००९ रोजी त्याच्या मृत्यूच्या बरोबर ३९ दिवसांनी करण्यात आले, त्यावेळी केवळ २०० लोक उपस्थित होते.

### मायकल जॅक्सनच्या मृत्यूनंतर धक्का बसल्याने १३ जणांनी स्वत:ला संपवलं...

मायकल जॅक्सनच्या मृत्यूच्या धक्क्यात शहरात १३ जणांनी आत्महत्या केली होती. ऑस्ट्रेलियातील आत्महत्या प्रतिबंध हॉटलाइनला त्याच्या मृत्यूच्या दुसऱ्या दिवशी सुमारे ५० कॉल आले. या सगळ्या चाहत्यांना मायकलच्या मृत्यूचा इतका मोठा धक्का बसला होता की त्यांना आत्महत्या करावीशी वाटली. त्या दिवशी हॉटलाइनचे सीईओ डॉन ओफ्रील यांनी एका मुलाखतीत सांगितलं की, त्यांच्याकडे अचानक कॉल करणाऱ्यांमध्ये वाढ झाली आहे. ते सगळेच नैराश्यात गेले आहेत ज्यामुळे त्यांना आत्महत्या करावीशी वाटतेय. या आधीच १३ जीव गेले होते.

### मृत्यूनंतरही कमावले पैसे...

फोर्ब्सनुसार, मायकलने मृत्यूनंतर १७ हजार कोटी रुपये कमावले होते. २०१९ च्या यादीनुसार, मायकल हा मृत्यूच्या १० वर्षांनंतरही सर्वाधिक कमाई करणारा गायक होता. तर दुसरा क्रमांक लोकप्रिय गायक एल्विस प्रेस्लीचा होता. २०१८ पर्यंत मायकलच्या नावाने २८ अब्ज कमाई केली होती. पण आणखी एका अहवालानुसार, मायकल त्याच्या मृत्यूच्या अगदी आधी दिवाळखोरीच्या मार्गावर होता. अशा स्थितीत त्याच्या मृत्यूनंतरच्या कमाईतून कुटुंबाने त्याचं सर्व कर्ज फेडलं होतं.

## पॉपस्टार मायकलच्या जीवनाशी संबंधित १० मनोरंजक तथ्ये

जरी मायकल जॅक्सन आज या जगात, आपल्यात नसला, तरी त्याला कोणत्याही वेगळ्या ओळखीची आवश्यकता नाही. त्याच्या कारकीर्दीमुळे तो अमर झाला आहे. पिढ्यान् पिढ्या त्याचे स्मरण होताच राहील. १९६४ मध्ये तो आपल्या कुटूंबाच्या पॉप ग्रुपमध्ये सामील झाला होता. जॅक्सन फाईव्ह असे या ग्रुपचे नाव होते.

● *आज (२५ जून) त्याची पुण्यतिथी आहे. तर आज या खास प्रसंगी त्याचे स्मरण करून आपण त्याच्या जीवनाशी संबंधित काही उत्तम रंजक गोष्टी जाणून घेऊया.*

### वडील बेल्टने मारायचे

मायकलच्या लहानपणी त्यांची घरची आर्थिक परिस्थिती चांगली नव्हती, म्हणून मायकलच्या वडिलांनी १९६४ मध्ये जॅक्सन ब्रदर नावाचा बँड तयार केला, ज्यामध्ये सर्व भावंडे रस्त्यावर परफॉर्मन्स देऊन पैसे कमवत असत. मायकलच्या वडिलांना तो विशेष आवडला नाही. मायकलच्या नाक आणि चेहऱ्याची खिल्ली उडवून ते मायकलला अनेकदा मारहाण करायचे.

एका मुलाखतीत मायकलने सांगितलेलं की, जेव्हा त्याचं गाणं खराब व्हायचं तेव्हा त्याचे वडील त्याला बेल्टने मारायचे. मायकलच्या मनावर त्याच्या वडिलांच्या वृत्तीचा वाईट परिणाम झाला होता.पण, जेव्हा मायकल जॅक्सनची वेळ बदलली तेव्हा त्याने कुटुंबातील सर्वांना मागे सोडले.

१) मायकल जॅक्सन पहिल्यांदाच शिवसेनेच्या निमंत्रणावर मुंबईत आला होता. जिथे विमानतळावर त्याचे अभिनेत्री सोनाली बेंद्रे हिने स्वागत केले होते. त्या काळात बॉलिवूडमधीलच नव्हे तर दक्षिणच्या इंडस्ट्रीतील अनेक बडे कलाकार त्याला भेटायला आले होते.

२) मायकेल जॅक्सनचा अल्बम 'थ्रिलर' हा आतापर्यंतचा सर्वाधिक विक्री होणारा अल्बम आहे.

३) मायकल जॅक्सन आणि वादांचे नाते तसे चर्चित होते. लैंगिक अत्याचाराच्या गंभीर आरोपांचा त्याने अनेक वेळा सामना केला होता. २००२ मध्ये त्याने स्वतःच्या मुलाला बाल्कनीच्या बाहेर लटकवल्यामुळे हा अभिनेता चर्चेत आला होता. लैंगिक अत्याचाराच्या आरोपाखाली तो दोन दिवस तुरूंगातही होता.

४) मायकल जॅक्सन जिवंत राहण्यासाठी देखील ऑक्सिजन चेंबरमध्ये झोपायचा. त्याचा असा विश्वास होता की, असे केल्याने आपले शरीर चांगले आयुष्य जगते आणि आपण अधिक आयुष्य जगू शकतो. त्याची १५० वर्षे जगण्याची इच्छा होती. पण ५० व्या वर्षीच त्याचा मृत्यू झाला.

५) एचआयव्ही / एड्सच्या विविध रुग्णांना मदत करण्याच्या महत्त्वपूर्ण कार्यामुळे जॅक्सन यांना माजी राष्ट्राध्यक्ष रोनाल्ड रीगन यांनी मानवतावादी पुरस्कार जाहीर केला.

६) मार्च २००९ मध्ये मायकेल जॅक्सन म्हणाला होता की, 'दिस इज इट' हीच माझी शेवटची मैफल असेल. मायकल या नंतर कोणतीही मैफिली करणार नाही, असे जाहीर करण्यात आले होते. मात्र, हा कार्यक्रम होण्यापूर्वीच २५ जून, २००९ रोजी मायकलला हृदयविकाराचा झटका आला आणि त्यातच त्याचे निधन झाले.

७) मायकल जॅक्सन याच्या निधनानंतर इंटरनेट क्रॅश झाले होते. पॉप स्टारच्या मृत्यूची बातमी दुपारी ३:१५ वाजता आली. ज्यानंतर विकिपीडिया, एओएल आणि ट्विटर एकत्र क्रॅश झाले होते.

८) मायकल जॅक्सनच्या मृत्यूनंतर त्याचा मृतदेह दोनदा पोस्टमार्टमसाठी पाठविला गेला. कारण मायकलची हत्या झाल्याची कुटुंबियांनी शंका होती.

९) असे म्हणतात की, मायकलच्या पोस्टमॉर्टम अहवालात असे सांगितले गेले होते की, त्याच्या शरीरावर सुईचे बरेच डाग आहेत. मृत्यूच्या काही तासांपूर्वीच त्याने मोठ्या प्रमाणात ड्रग्स घेतले होते.

**अडीच अब्ज लोकांनी पाहिली अंत्ययात्रा**

१०) मायकेल जॅक्सनची अंत्ययात्रा सर्वत्र लाईव्ह दाखवली गेली, ज्यास सुमारे अडीच अब्ज लोकांनी पाहिले होते. हे आतापर्यंतचे सर्वाधिक पाहिले गेलेले थेट प्रक्षेपण होते.

# भारतातील आणीबाणीचे २१ महिने; ८३ लाख लोकांची सक्तीने नसबंदी

**हॅलो प्रभात**

**देशात ४९ वर्षापूर्वी आणीबाणी लागू करण्यात आली होती. मात्र त्याचे परिणाम काँग्रेस पक्ष आजही भोगत आहे. आणीबाणीवरून गैर काँग्रेस पक्ष वारंवार काँग्रेसवर निशाणा साधतात. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींनी सिद्धार्थ शंकर रे यांच्या सूचनेवरून आणीबाणी लागू केली होती, असे म्हटले जाते. मात्र, यामागचे खरे कारण काय होते, ते जाणून घेऊया.**

४९ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी म्हणजे २५ जून १९७५ रोजी रात्री ११.३० वाजता संपूर्ण देशात आणीबाणी जाहीर करण्यात आली होती. २६ जून रोजी पहाटे तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आकाशवाणीवरून देशाला संबोधित केले. 'राष्ट्रपतींनी देशात आणीबाणी जाहीर केली आहे. मात्र यामुळे कोणालाही घाबरण्याची गरज नाही', असे त्या म्हणाल्या होत्या.

### 'अंतर्गत गोंधळ' हे कारण सांगण्यात आले

या आणीबाणीची राजकीय 'शिक्षा' काँग्रेस पक्ष अजूनही भोगत आहे. विरोधक वारंवार त्यांना यावरून लक्ष्य करतात. आणीबाणीचा कालावधी २५ जून १९७५ ते २१ मार्च १९७७ पर्यंत म्हणजे २१ महिन्यांचा होता. २६ जून १९७५ रोजी पोलिसांनी देशातील विरोधी पक्षाच्या सर्व प्रमुख नेत्यांना अटक केली. माध्यम कार्यालयांवर बंदी घालण्यात आली. सेन्सॉरशिवाय कोणतीही बातमी प्रसिद्ध होऊ शकत नव्हती. तसेच वृत्त कार्यालयांची वीजही खंडित करण्यात आली होती. आणीबाणीच्या काळात घटनात्मक अधिकार निलंबित करण्यात आले होते. औपचारिकरित्या, 'अंतर्गत गोंधळ' हे आणीबाणीचे कारण सांगण्यात आले होते. देशाला संबोधित करताना इंदिरा गांधींनी विदेशी शक्तींचाही उल्लेख केला होता. बाहेरील शक्ती देशाला कमकुवत आणि अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत, असे गांधी म्हणाल्या होत्या.

### आणीबाणीपूर्वीची राजकीय परिस्थिती

१९६६ मध्ये इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या. नोव्हेंबर १९६९ मध्ये काँग्रेस फुटली. एक गट इंदिरा गांधी (काँग्रेस आर) सोबत राहिला, तर दुसऱ्या गटाला काँग्रेस (ओ) असे म्हटले गेले. 'काँग्रेस ओ' यांना सिंडिकेट गटाचे नेते म्हटले जात होते. १९७३-७५ च्या दरम्यान इंदिरा गांधी आणि त्यांच्या सत्तेच्या विरोधात देशातील सर्व भागात अनेक आंदोलने झाली.



देशाला संबोधित करताना इंदिरा गांधी

२५ जून : आणीबाणी स्मृतिदिन...

### गुजरातचे नवनिर्माण आंदोलन

ही चळवळ १९७३ मध्ये झाली. त्याची सुरुवात प्रामुख्याने कॉलेजच्या फी वाढीच्या विरोधात झाली. त्यानंतर गुजरात विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी स्थानिक काँग्रेस सरकार बरखास्त करण्याची मागणी केली. चिमणभाई पटेल हे त्यावेळी गुजरातचे मुख्यमंत्री होते. जयप्रकाश नारायण आणि मोरारजी देसाई यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला. गुजरात आंदोलनातूनच प्रेरणा घेऊन बिहारमध्ये विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू झाले. येथे आंदोलनाचे नेतृत्व खुद्द जयप्रकाश नारायण यांच्या हातात होते. दरम्यान, जॉर्ज फर्नांडिस यांनी १९७४ मध्ये रेल्वे सेवा विस्कळीत केली. त्यानंतर ठिकठिकाणी संप झाले. या चळवळीतून नितीशकुमार, लालू यादव यांच्यासारखे नेते उदयास आले.

### 'राजनारायण' प्रकरण काय होते

रायबरेली लोकसभा मतदारसंघात इंदिरा गांधींनी समाजवादी नेते राजनारायण यांचा जवळपास एक लाखांहून अधिक मतांनी पराभव केला होता. मात्र राजनारायण विजयाबाबत एवढे आश्वस्त होते की त्यांनी निकालाआधीच विजयी मिरवणूक काढली होती. जेव्हा निकाल जाहीर झाला तेव्हा त्यांना विश्वासच बसला नाही की आपला पराभव झाला आहे. त्यामुळे त्यांनी १९७१ मध्ये इंदिरा गांधी यांच्याविरोधात निवडणूक फसवणुकीचा गुन्हा दाखल केला होता. त्यांनी भ्रष्ट कारभार आणि चुकीच्या मार्गाने निवडणूक घेतल्याचा आरोप केला होता. सोप्या भाषेत सांगायचे तर सरकारी कर्मचाऱ्यांच्या मदत आणि परवानगीपेक्षा जास्त खर्च केल्याचा आरोप झाला. १५ जुलै १९७१ मध्ये अलाहाबाद हायकोर्टात सुरु झाले. सुनावणी सुरु असतानाच इंदिरा गांधी आणि राजनारायण सुप्रीम कोर्टात गेले. मार्च १९७५ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाचे जस्टिस जगमोहन लाल सिन्हा यांनी पंतप्रधान इंदिरा गांधी यांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी कोर्टात हजर राहाण्याचा आदेश दिला. इंदिरा गांधी कोर्टात हजर झाल्या. जस्टीस सिन्हा यांनी १२ जून १९७५ रोजी इंदिरा गांधीची निवडणूक रद्द करण्याचा निर्णय दिला. न्यायमूर्ती सिन्हा यांनी इंदिरा गांधींना दोषी ठरवले. अलाहाबाद हायकोर्टाने त्यांना सुप्रीम कोर्टात अपील करण्यासाठी मुदत दिली. सुप्रीम कोर्टाचे सुटीचे न्यायाधिश व्ही.आर. कृष्ण अय्यर यांनी अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयाला स्थगिती दिली.

### न्यायाधिशांनी इंदिरा गांधींवर आणली बंदी

२४ जून १९७५ रोजी आपल्या निर्णयात जस्टिस अय्यर यांनी इंदिरा गांधींना पंतप्रधान म्हणून संसदेत येण्याची परवानगी दिली, पण लोकसभा सदस्य म्हणून त्यांचा मतदानाचा अधिकार गोठवला. त्या संसदेत उपस्थित राहू शकल्या असत्या आणि पंतप्रधानही होऊ शकल्या असत्या. पण तसे झाले नाही आणि हा निर्णय इंदिरांना झोंबला. हा आपला अपमान असल्याचे त्यांनी मानले. दुसऱ्याच दिवशी त्यांनी कॅबिनेटची बैठक बोलवली आणि आणीबाणी लागू करण्याचे पत्र राष्ट्रपतींना दिले. त्यावर राष्ट्रपतींनी २५ आणि २६ जूनच्या मध्यरात्री स्वाक्षरी केली आणि देशात आणीबाणी लागू झाली.

### ८३ लाख लोकांची सक्तीने नसबंदी केली

याच्या एका दिवसानंतर राष्ट्रपती फखरुद्दीन अली अहमद यांनी देशात आणीबाणी जाहीर केली. २६ जून १९७५ रोजी इंदिरा गांधींनी देशाला संबोधित केले. आणीबाणीच्या काळात अशी काही पावले उचलण्यात आली होती, ज्यावरून आजतागायत वाद सुरू आहे. 'स्टरलायजेशन' हे त्यापैकीच एक होते. लोक याला 'नसबंदी' म्हणून ओळखतात. दिल्लीतील एका भागात सक्तीने नसबंदी लागू करण्यात आली. संजय गांधी यांनी हा आदेश दिला होता. आणीबाणीच्या काळात संपूर्ण देशात सुमारे ८३ लाख लोकांची सक्तीने नसबंदी करण्यात आल्याचा अंदाज आहे.

### १९७७ मध्ये आणीबाणी संपुष्टात

मिसा आणि डीआयआर अंतर्गत एक लाखाहून अधिक नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले. मीडिया रिपोर्ट्सनुसार, संजय गांधी, बन्सीलाल, विद्याचरण शुक्ला आणि ओम मेहता यांसारख्या नेत्यांकडे त्यावेळी सत्तेचा ताबा होता. संजय गांधींच्या सांगण्यावरून व्हीसी शुक्ला यांना दळणवळण मंत्री करण्यात आले. त्यावेळचे ज्येष्ठ नेते सिद्धार्थ शंकर रे यांनी इंदिरा गांधींना आणीबाणी लागू करण्याचा सल्ला दिला होता, असा दावाही काही मीडिया रिपोर्ट्समध्ये करण्यात आला आहे. १८ जानेवारी १९७७ रोजी इंदिरा गांधींनी सर्व राजकीय कैद्यांची सुटका करण्याचे आदेश दिले आणि नवीन निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या. २३ मार्च १९७७ रोजी आणीबाणी संपली.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात,** कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय :** ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF-७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत)

■ व्यवस्थापकीय संपादक : संजय भिडे ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

## आदर्श कॉलेजमध्ये योगदिन साजरा

**विटा : हॅलो प्रभात**

येथील आदर्श कॉलेजमध्ये जिमखाना विभागातर्फे योग दिन उत्साहात साजरा झाला. प्राचार्य डॉ. यू. के. मोहिते यांच्या हस्ते योगास प्रारंभ झाला. योग व प्राणायाम, सूक्ष्म व्यायाम, सूर्यनमस्काराबरोबर संतुलित आहार घेणे गरजेचे आहे. त्यामुळे आपली कार्यक्षमता उत्तम राहते, असे प्राचार्य मोहिते यांनी सांगितले. यावेळी ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य डी. बी. कुंभार, प्रा. डॉ. संभाजी शिंदे, प्रा. आर. के. पवार, प्रा. एन. एस. शिंदे, उपस्थित होते.

# संमिश्र

## क्रांती कडून वारकऱ्यांसाठी पाण्याचे टँकर



**कुंडल : हॅलो प्रभात**

श्री संत शिरोमणी ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा २०२५ च्या पार्श्वभूमीवर आळंदी ते पंढरपूर पायी दिंडी क्रमांक एक व सात रथापुढे सालाबाद प्रमाणे याही वर्षी वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा क्रांती अग्रणी जी.डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लि. कुंडलच्या वतीने उपलब्ध करून देण्यात आला आहे. या पिण्याच्या पाण्याच्या टँकरचे पूजन आमदार अरुण लाड यांच्या हस्ते करण्यात आले. संत परंपरेचा तेजस्वी वारसा लाभलेला आळंदी ते पंढरपूर हजारो भाविक वारकऱ्यांनी दरवर्षी निष्ठेने पार केला जातो. ही सेवा म्हणजे श्रद्धा आणि सामाजिक बांधिलकीची यांचे प्रत्यक्ष उदाहरणच आहे.आपणही या वारी साठी आपले योगदान देऊन श्री. विठ्ठल व संत वारकरी संप्रदाया प्रती आपली श्रद्धा व्यक्त करीत आहोत असे आ.अरुण लाड म्हणाले.या प्रसंगी परिसरातील वारकरी मंडळी व क्रांती कारखान्याचे अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

## अंबुजा व एसीसी बनल्या आघाडीच्या उत्पादक कंपन्या

**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या अदाणी पोर्टफोलिओच्या सिमेंट आणि बांधकाम साहित्य क्षेत्रातील कंपन्या अंबुजा सिमेंट्स आणि एसीसी यांनी शाश्वत विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण उपलब्धी मिळवली आहे. या दोन्ही कंपन्या त्यांच्या क्षेत्रातील अशा अग्रगण्य भारतीय सिमेंट कंपन्या ठरल्या आहेत, ज्यांच्या नेट-झीरो उद्दिष्टांना सायन्स बेस्ड टार्गेट इनिशिएटिव्ह कडून मान्यता प्राप्त झाली आहे.कॉर्पोरेट नेट-झीरो स्टँडर्ड हे हवामान विज्ञानाशी सुसंगत असलेले कॉर्पोरेट नेट-झीरो उद्दिष्ट निश्चितीचे जगातील एकमेव चौकट आहे.

## पॅरिस एअर शोमध्ये वामसी ग्रुप सहभागी



**मुंबई : हॅलो प्रभात**

भारताच्या एरोस्पेस वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा पार करत हैद्राबादमध्ये स्थित असलेल्या रघु वामसी एरोस्पेस ग्रुप या हाय-प्रिसिजन मॅन्युफॅक्चरिंगमध्ये आघाडीच्या कंपनीने ५५व्या इंटरनॅशनल पॅरिस एअर शोमध्ये आपले सर्वात नवे डिफेन्स आणि प्रपल्शन तंत्रज्ञान प्रस्तुत केले आहे. स्वदेशी बनावटीच्या मायक्रो टर्बोजेट इंजिनांपासून ते उच्च कामगिरी बजावणाऱ्या कामिकाझे ड्रोन्सपर्यंत, या कंपनीने प्रदर्शित केलेल्या सर्व तंत्रज्ञानाने आपला वाढता जागतिक विस्तार आणि भारताच्या संरक्षण तंत्रज्ञानामध्ये आत्मनिर्भर होण्याच्या दिशेने सुरु असलेल्या वाटचालीत योगदान देण्याप्रती दृढ वचनबद्धता दर्शवली आहे.

## रिअलचा कॉकटेल मिक्सर श्रेणीत प्रवेश




**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील सर्वाधिक पसंतीचा पॅकेज्ड फळांच्या रसाचा ब्रँड रिअलने गुणवत्ता आणि चवीचा वारसा जपत कॉकटेल मिक्सरची प्रीमियम श्रेणी 'रिअल चियर्स' लाँच करून रिअल पोर्टफोलिओचा विस्तार करण्याची घोषणा केली आहे. पहिल्या टप्प्यात डाबरने रिअल चियर्स अंतर्गत जामुनटिनी, ग्रीन ॲपल मोजिटो, टॉनिक वॉटर आणि जिंजर एले हे चार आकर्षक प्रकार लाँच केले आहेत. आजच्या ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी रिअल चियर्स अत्यंत बोल्ड, व्हायब्रण्ट आणि आकर्षक पॅकेजिंगमध्ये आणले आहे.

## नैसर्गिक संकटात शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा : विराज नाईक



**शिराळा : हॅलो प्रभात**

तालुक्यात झालेल्या व होत असलेल्या पावसामुळे झालेले शेती पिकांचे नुकसान व पेरणी न झाल्याने शेतकऱ्यांचे होणाऱ्या संभाव्य नुकसानीची भरपाई देवून नैसर्गिक संकटात सापडलेल्या डोंगराळ व अतिम ागास भागातील शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यावा, अशी मागणी राष्ट्रवादी जिल्हा युवक काँग्रेसचे माजी अध्यक्ष विराज नाईक व तालुकाध्यक्ष बी. के. नायकवडी यांनी केली. तहसीलदार श्यामला खोत-पाटील यांना दिलेल्या निवेदनात म्हटले की, शिराळा तालुक्यात यावर्षी ११ मे २०२५ पासून महिन्यात मॉन्सूनपूर्व पाऊस मोठ्या प्रमाणात झाला. त्याला जोडूनच मॉन्सूनचा पाऊस सुरू होऊन आज अखेर दररोज हजेरी लावत आहे. शिराळा तालुका हा भात पिकाचा हुकमी तालुका म्हणून ओळखला जातो. तालुक्यात ११ ते १२ हजार हेक्टर क्षेत्रात भात पिकाची पेरणी होते. त्यामध्ये बहुतांशी धुळवाफेवरील पेरणी असते. यावेळी सुमारे ५० टक्के पेरण्या होऊ शकलेल्या आहेत, असेच चित्र आहे. या शिवाय भुईमुग व सोयाबीन पिकांचेही क्षेत्र आहे.

खरीप हंगामासाठी मशागत करून शेती तयार करण्यावर शेतकऱ्यांकडून मोठा खर्च झाला आहे. मात्र मॉन्सूनपूर्व व मॉन्सूनमधील सततच्या पावसाने शेतकऱ्यांना पेरण्या करता आल्या नाहीत. त्यामुळे मशागत खर्चही वाया गेला आहे. मध्यंतरी पावसाने उघडीप दिल्यानंतर काही प्रमाणात जमिनीस वाफसा आल्याने काही शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. पण पुन्हा पावसाने संततधार लावल्याने शेतात पाणी साठले. त्याचा परिणाम पेरणी केलेल्या पिकांच्या उगवणीवर होऊन ती झालेली नाही अथवा अल्प प्रमाणात उगवण झाली आहे. या हंगामातील झालेल्या नुकसानीचे सविस्तर पंचनामे होऊन शेतकऱ्यांना सत्वर नुकसान मिळावी, अशी मागणी आम्ही करत आहोत.

निवेदन देताना 'विश्वास'चे संचालक संचालक बाबासाहेब पाटील, शिराळा शहर अध्यक्ष सुनील कवठेकर, युवकचे शिराळा शहर अध्यक्ष अमित गायकवाड, सुनील तांदळे, डॉ. तानाजी पाटील, गजानन पाटील आदी मान्यवर व युवक कार्यकारणीचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

## संत निरंकारी मिशनच्या वतीने योग दिवस साजरा

**तासगांव : हॅलो प्रभात**

संत निरंकारी मिशन च्या वतीने संत निरंकारी सत्संग भवन तासगांव या ठिकाणी आंतरराष्ट्रीय योग दिवस साजरा करण्यात आला.ज्यामध्ये निरंकारी भक्तगण व सेवादल बंधू भगिनी यांनी उत्साहाने भाग घेतला. स्थानिक योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर पार पडले. संपूर्ण भारत वर्षामध्ये १००० पेक्षा अधिक ठिकाणी एकाच वेळी आंतरराष्ट्रीय योग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते.



संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन द्वारे 'योग दिवस' नियमितपणे देशव्यापी स्तरावर आयोजित केला जात आहे. सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या आशीर्वादाने या उपक्रम ाचा सातत्याने विस्तार होत आहे.सतगुरु माताजींचे हेच मार्गदर्शन आहे, की 'स्वस्थ मन, सहज जीवन' त्यांच्या विचारांतून हे स्पष्ट होते की मनुष्य तन ही ईश्वराची अनुपम देणगी आहे जी स्वस्थ आणि सशक्त बनवूनच मनुष्य आपल्या आध्यात्मिक व सामाजिक कर्तव्यांचा यथार्थ निर्वाह करु शकतो.

योग ही भारतातील एक प्राचीन विद्या आहे जी केवळ शरीरालाच बलवान बनवते असे नव्हे तर मनाला शांती देते आणि आत्म्याला जागृत करण्याची क्षमता बाळगते याचा नियमित अभ्यास करुन मनुष्य तनाव, असंतुलन आणि रोग इत्यादींपासून स्वत:चा बचाव करुन आत्मिक शांती व सामाजिक सौहार्दाच्या दिशेने अग्रेसर होतो. आजच्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये अशा प्रकारच्या आयोजनाचा मूळ उद्देश हाच आहे, की आपण स्वत:च्या स्वास्थ्याला सर्वोच्च प्राथमिकता द्यावी आणि एक सुखद, संतुलित व शांतीपूर्ण जीवन जगण्याच्या दिशेने वळावे

## कॉलेज कॉर्नर ते गाडे चौक रस्त्याच्या डांबरीकरणास सुरुवात



**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली वार्ड क्रं.१० मधील बहुचर्चित कॉलेज कॉर्नर ते मारुती गाडे चौक (मेहता हॉस्पिटल) या मार्गाच्या डांबरीकरणास मा.आमदार सुधीरदादा गाडगीळ यांचे हस्ते सुरुवात करण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नागरी विकास योजनेंतर्गत सदरच्या रस्त्यासाठी माजी नगरसेवक जगन्नाथ ठोकळे यांच्या मागणीनुसार आमदार सुधीरदादा गाडगीळ यांनी निधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल नागरीकांच्या वतीने मा.आमदार सुधीरदादा गाडगीळ यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी जगन्नाथ ठोकळे,अनारकली कुरणे,छायाताई सरवदे,मनोज उर्फ आशिष गाडे,अर्जुन मजले,अरुण आठवले,संग्राम घोरपडे,जमीर कुरणे,संतोष सरवदे,राजेंद्र मुळीक, बाबुभाई पटेल, सुरज पवार,रणजीत सावंत,उत्तम महारगुडे प्रियानंद कांबळे,अरुण धनवडे,राहूल हातगिने,संतोष व्हनमाने,सचिन ऐवळे,अजय उबाळे,शहेनशाह मकनदार, शंकर कांबळे,गणपती चवडीकर,सुरेश गंलाडे,रणधीर कांबळे,गजानन गस्ते,धनेश कातगडे, रामभाऊ चितळे,मनिष कोठारी,राजु गस्ते,रावसाहेब कोळी(मामा),नितातार्इ कांबळे,शंकर आवळे,आप्पा नरुटे, धोंडीराम कदम,नितीन जाधव, हणमंत कतनाळे,सचिन जाधव,शशिकांत माळी,आप्पा नरोटे,नागराज शेट्टी,नितीन जाधव यांचे सह परिसरातील अन्य मान्यवर व भाजपा-आरपीआयचे पदाधिकारी उपस्थित होते.

## सलीम सारंग यांचा आ.संग्राम जगताप यांच्यावर निशाणा

### मुस्लिम विरोधी वक्तव्यांवरून संताप

**पुणे : मुज्जम्मील शेख**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम सारंग यांनी आपल्या पक्षातीलच आमदार संग्राम जगताप यांच्यावर थेट निशाणा साधत त्यांच्या मुस्लिम विरोधी वक्तव्यांचा तीव्र निषेध केला आहे. जगताप यांनी भाषणात जहाँ आयेगा लांडा, वहाँ आयेगा डांडा आणि जहाँ आयेगा अली, वहाँ आयेगा बजरंगबली अशी वादग्रस्त आणि समाजात तेढ निर्माण करणारी विधाने केल्याचे सलीम सारंग यांनी म्हटले आहे. सारंग यांनी आपल्या निवेदनात




सांगितले की, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष नेहमीच शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारसरणीवर चाललेला असून धर्मनिरपेक्षता व सर्वधर्मसमभाव हेच पक्षाचे खरे अधिष्ठान आहेत. त्यामुळे अशा प्रकारची वादग्रस्त, द्वेषमूलक आणि समाजात फूट पाडणारी वक्तव्ये पक्षाच्या धोरणाविरोधात आहेत.सलीम सारंग यांनी ही मागणी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ना.अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांच्याकडे केली असून, आ. संग्राम जगताप यांच्यावर तात्काळ कारवाई करावी अशी भूमिका त्यांनी घेतली आहे.

या प्रकरणामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अंतर्गत मतभेद उफाळून आले असून, पक्षाचे वरिष्ठ नेतृत्व आता या प्रकरणावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूलचे CET परीक्षेत यश





**कुंडल : हॅलो प्रभात**

कुंडल (ता.पलूस) येथील क्रांती इंटरनॅशनल पब्लिक स्कूल संचलित व्हि. जी. एल. अकॅडम ीचे महाराष्ट्र सी ई टी परीक्षेत १४ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शाळेचा सीईटी परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला आहे.या परीक्षेसाठी पी सी एम साठी १० विद्यार्थी बसले होते. पी सी बी साठी ४ विद्यार्थी बसले असून सर्व विद्यार्थी सी ई टी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.या यशस्वी विद्यार्थ्यांत पी सी एम परीक्षेत कु प्रज्वल राजकुमार जाधव ९७ टक्के , कु श्रेया जयदीप शिंदे ९० टक्के, कु अनुजा माणिक लाड ८५ टक्के तर पी सी बी परीक्षेत कु प्रणया जयदीप पाटील ८७ टक्के, कु वेदिका विक्रमसिंह लाड ८२ टक्के मिळून यश संपादन केले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना संस्थेचे चेअरमन आमदार अरुण अण्णा लाड, शाळेचे चेअरमन किरण तात्या लाड, व्हा.चेअरमन शरद भाऊ लाड, सी.ई.ओ. रणजित भैय्या लाड, शाळेच्या प्राचार्या रूपाली शहा, व्यवस्थापक विजय जाधव, सम न्वयक संदीप जाधव, व्हि. जी. एल. अकॅडमीचे समन्वयक रोहन पवार यांच्यासह शाळेचे सर्व संचालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## राजारामबापू इन्स्टिट्यूट येथे योग दिन उत्साहात

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर येथे आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात आणि उत्सवाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ७:३० वाजता महाविद्यालयाच्या जिम्नॅशियममध्ये करण्यात आली. योगदिनाचे उद्घाटन मा. प्राचार्य डॉ. पी. व्ही. कडोले यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे जिमखाना विभाग प्रमुख प्रा. संग्रामसिंह



पाटील तसेच डीन स्टूडेंट डेव्हलपमेंट डॉ. एल. एम. जुगुळकर व अन्य प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात योग प्रशिक्षन हे व्हिडिओ कॉन्फरन्स द्वारे सर्वांना शिकविण्यात आले. यावेळी प्रा. संग्रामसिंह पाटील यांनी योगाचे आरोग्यावर होणारे फायदे स्पष्ट करून विद्यार्थ्यांम ध्ये योगाबद्दल जागरूकता निर्माण केली. विद्यार्थ्यांनी संपूर्ण उत्साहाने सहभाग घेत योगासने केली. विशेषतः सूर्यनमस्कार, अनुलोम-विलोम, कपालभाती, ताड़ासन व भ्रामरी प्राणायाम यांचा सराव करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ.पी. व्ही. कडोले यांनी उपस्थितांचे आभार मानले व विद्यार्थ्यांना दररोज योगाचे नियमितपणे पालन करण्याचे आवाहन केले.

## अर्थसाक्षरतेशिवाय विकास अशक्य : प्रा.डॉ.विठ्ठल शिवणकर

**विटा : हॅलो प्रभात**

अलीकडच्या काळात दिवसेंदिवस वाढत असलेल्या आर्थिक गुन्ह्यांचा विचार केला तर इथूनपुढच्या काळात आर्थिक साक्षरतेवर अधिक भर देण्याची गरज आहे. त्यासाठी संशोधक आणि लेखकांनी समजेल उमजेल अशा पद्धतीने लिखाण करून वाचकांच्या पर्यंत पोहोचले पाहिजे असे मत प्राचार्य डॉ.विठ्ठल शिवणकर



यांनी व्यक्त केले.रयत शिक्षण संस्थेच्या विटा येथील बळवंत महाविद्यालयात लेखक आपल्या भेटीला या उपक्रमांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या मराठी विश्व कोश निर्मिती मंडळाचे माजी सदस्य व बळवंत महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा.संजय ठिगळे यांनी महाविद्यालयाला आपल्या अर्थतरंग या पुस्तकाच्या प्रती भेट दिल्या.प्रारंभी उपस्थितांचे स्वागत अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ.प्रवीण बाबर यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मा. संग्राम देशमुख होते.याप्रसंगी बोलताना अर्थतरंग पुस्तकाचे लेखक प्रा.संजय ठिगळे म्हणाले की,मी रयत शिक्षण संस्थेचा विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो.एवढेच नव्हे तर मी ज्या महाविद्यालयात शिकलो त्या महाविद्यालयातील विद्यार्थी माझे पुस्तक वाचत आहेत. एक लेखक म्हणून मला मनस्वी आनंद होतो आहे.प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना मा संग्राम देशमुख म्हणाले की, आपल्या महाविद्यालयाच्या प्रेमापोटी माजी विद्यार्थी महाविद्यालात जाऊन हितगुज करतात पुस्तके भेट देतात हेच खरे महाविद्यालयाचे यश आहे.याप्रसंगी उप प्राचार्य प्रा . विष्णू मस्के त्याचबरोबर महाविद्यालयातील विविध विभागातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.

# कृषी जागरूकता उपक्रमासाठी कृषीदुत गडमुडशिंगीत

**गांधीनगर : हॅलो प्रभात**

गडमुडशिंगी (ता. करवीर) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठा अंतर्गत राजर्षी छत्रपती शाहू महाराज शासकीय कृषी महाविद्यालय, कोल्हापूरच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी कृषी जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यनुभव उपक्रमासाठी गडमुडशिंगी ग्रामपंचायतीस भेट दिली. गडमुडशिंगीच्या सरपंच अश्विनी शिरगावे व ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब पाटील यांनी कृषीदूतांचे स्वागत केले. या उपक्रमासाठी हर्षल ढवळे, युवराज चौधरी, ओंकार चंदनशिवे, अनुराज डावकेर, निखील ननवरे हे कुबिदुत २४ आठवडे वास्तव्यास असणार आहेत. या उपक्रमांतर्गत १८ प्रकारच्या प्रात्यक्षिकांचे



सादरीकरण करण्यात येणार आहे. यामध्ये माती परीक्षण, पीक संरक्षण, सेंद्रिय शेती, कीडरोग नियंत्रण, आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर, जनावरांची काळजी व संगोपन यांचा समावेश आहे.

बळीराजाशी देखील ते संवाद साधणार आहेत. या उपक्रमाचे नियोजन सहयोगी अधिष्ठाता डॉ.ए.ए.पिसाळ, डॉ. बी.टी. कोळगणे आणि प्राचार्य के.डी. गोरड व इतर विषय तज्ञांनी केले आहे. उपक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायतीकडून पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन सरपंच अश्विनी शिरगावे यांनी कृषीदुतांना दिले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुदर्शन पाटील, संजय सकटे, ग्राम महसूल अधिकारी अनिकेत गुरव यांच्यासह सुरज कांबळे, दिपक पाटील, दत्ता नेर्ले, संतोष कांबळे, ग्रामस्थ व शेतकरी बांधव उपस्थित होते.

## ७,५२,०७४ लोकांनी रचला इतिहास

**मुंबई : हॅलो प्रभात**

आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करत हॅबिल्ड या भारतातील पहिल्या हॅबिट-बिल्डिंग प्लॅटफॉर्मने उल्लेखनीय जागतिक टप्पा गाठला आहे, जेथे 'जागतिक स्तरावर ऑनलाइन योग क्लासमध्ये सर्वाधिक उपस्थिती' शीर्षकासाठी नवीन जागतिक विक्रम रचला आहे. २१ जून रोजी सकाळी अधिकृत वर्ल्ड रेकॉर्डच्या अध्यक्षतेखाली हॅबिल्डचे सौरभ बोथरा यांनी आयोजित केलेल्या समक्रमित, मार्गदर्शित सत्रात १६९ देशांमधील ७,५२,०७४ पेक्षा जास्त सहभागी व्हर्च्युअल पद्धतीने योगा करण्यासाठी एकत्र आले.

# राज ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त वही वाटप

## तासगाव मनसेच्या अमोल काळे यांचा उपक्रम

**तासगाव : हॅलो प्रभात**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांचा वाढदिवस तासगावात वही वाटपाने साजरा करण्यात आला. मनसेचे जिल्हा संघटक अमोल काळे यांनी यानिमित्त तालुक्यातील गरीब, गरजू लहान मुले व तरुणांना वह्यांचे वाटप करून अनोखा वाढदिवस साजरा केल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे. महाराष्ट्रावर व मराठी माणसांवर



नितांत प्रेम करणारा २१व्या शतकातील सर्वोत्तम भूमिपुत्र हिंदूजननायक राजसाहेब ठाकरे यांच्या संकल्पनेतील महाराष्ट्र घडवण्यासाठी, आपल्या राज्यातील कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शुक्रवारी महाराष्ट्र नवनिर्माण सेना तासगाव तालुक्याच्या वतीने तालुक्यातील गरजू विद्यार्थ्यांना मोफत वही वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाचे नियोजन महाराष्ट्र नवनिर्माण सेना रस्ते आस्थापना विभाग सांगली जिल्ह्याचे जिल्हा संघटक अमोल काळे यांनी केले.

यावेळी मोठ्या प्रमाणावर शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

## आनंददायी शिक्षण घेऊन जबाबदार नागरिक बना : प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे





**तासगाव : हॅलो प्रभात**

शिक्षणाचा मुख्य हेतू जबाबदार नागरिक घडवणे हा असून ज्ञानाची विज्ञानाशी सांगड घालून सुसंस्कारी विद्यार्थी घडविण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.विद्यार्थ्यांनी आनंददायी शिक्षण घेऊन जबाबदार नागरिक बनावे असे उद्गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे अर्थ सहसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय तासगाव येथे बी.ए. /बी.कॉम./बी. एस्सी. विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ प्रसंगी आयोजित कार्यक्रमात बोलताना काढले. ते पुढे म्हणाले नवीन शैक्षणिक धोरणात शिक्षणातील भिंती नष्ट झाल्या असून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयात विविध उपक्रम राबवले जातात.आपलं कौतुक करावं असं आपलं वर्तन असावे महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी असलेल्या भौतिक सुविधांचा योग्य वापर करावा.हे कॉलेज माझं आहे असं समजून विवेकानंद कुटुंबात सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.कॉलेजची शिस्त सांभाळून ज्ञान संपादन करा.महाविद्यालयाच्या सुसज्ज ग्रंथालयाचा लाभ घ्या.कला, क्रीडा,सांस्कृतिक विभागात आपले वेगळेपण सिद्ध करा. राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय छात्र सेनेमध्ये सहभागी व्यक्तिमत्त्वाचा विकास करा.

# मनस्वी ग्रुपच्या आरोग्य शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**शिराळा : नारायण घोडे-पाटील**

मनस्वी ग्रुप व जीवन विद्या मिशन यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत तालुक्यातील वैजनाथ येथे खेडेगावातील महिला व जेष्ठ नागरिकांच्या स्वास्थासाठी आयोजित केलेल्या मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिरास साडे तीनशे जणांनी तपासणी करून घेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वैजनाथ येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



पोदार वैद्यकीय रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. निकेतन झोडपे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या टीमने रुग्णांची तपासणी केली. यावेळी उच्च रक्तदाब, थायरॉईड, वातविकार, नेत्रविकार, अमोनिया, मानेचे विकार, दंत विकार, अस्थमा विकार, महिलांचे विकार यावर उपचार करण्यात आले. तसेच त्यांना मोफत औषधे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद माजी सदस्य व मनस्वी ग्रुपच्या विश्वस्त आशाताई झिमुर यांनी, 'रुग्णांची सेवा करणे हेच आमच्या संस्थेचे ब्रीद आहे, असे स्पष्ट केले.

जीवन विद्या मिशनचे ग्राम समृद्धी अभियानचे प्रमुख आनंद राणे आणि दादर व डोंबिवली शाखेच्या सहकाऱ्यांनी शिबिर यशस्वी करण्यास विशेष मेहनत घेतली.

## भक्तीयोग कार्यक्रमात अनंतराव पवार अभियांत्रिकीचा सहभाग

**पुणे : हॅलो प्रभात**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, महाराष्ट्र शासन ,अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च पर्वती, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून आषाढी वारीतील वारकर्यांसाठी भक्तीयोग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विठुरायाचे भक्तगण नामस्मरणा बरोबर विविध योगासने करून योगभक्ती मध्ये तल्लीन होतील. योगसाधनेच्या माध्यमातून विविध व्याधींवर मात करता येते या विषयी वारकर्यामध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी महाविद्यालयाच्या राष्ट्रीयसेवा योजना विभागाच्या वतीने दिंड्यामध्ये जाऊन झूम मिटिंग च्या माध्यमातून विविध योगासनाचे प्रात्यक्षिक करून घेतली. या कार्यामध्ये विश्वकर्मा ट्रस्ट गंगाधाम, हमाल पंचायत,मारुती मंदिर ट्रस्ट यांचे सहकार्य लाभले. भक्तीयोग कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली राष्ट्रीयसेवा योजना अधिकारी प्रा. आकाश दोडके, गणेश कोंढाळकर यांनी केले. या भक्ती योग कार्यक्रमात ६१० वारकरी सहभागी झाले. अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस मा. प्रमिला गायकवाड यांनी महाविद्यालयाने भक्तियोग कार्याक्रमाचे आयोजन केल्याबद्दल अभिनंदन केले.

# भाजपा जैन प्रकोष्टच्या राज्य उपाध्यक्षपदी रावसाहेब पाटील

**मुंबई : हॅलो प्रभात**

सांगली जिल्ह्यातील जैन समाजाचे सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब पाटील यांनी भाजपात पक्षप्रवेश केला.या प्रवेश सोहळ्यास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री मंगलप्रभात लोढा, आ.सुरेश खाडे, संदीप भंडारी, प्रशांत गोंडाजे यांच्यासह सांगली, कोल्हापूर, सोलापूर परिसरातील विविध संस्थांचे पदाधिकारी, जैन समाजाचे प्रमुख कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी



प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी पाटील यांचे पक्षात स्वागत केले. तसेच त्यांच्या सुरू असलेल्या सामाजिक कार्याला भाजप आणि शासन पूर्णपणे पाठबळ देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जैन समाजाच्या उन्नतीसाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जातील आणि पाटील यांच्यासारख्या सक्षम नेतृत्वामुळे पक्ष अधिक बळकट होईल, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या निर्देशानुसार संदीप भंडारी यांनी पाटील यांची भाजपा जैन प्रकोष्टच्याच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी सन्माननीय निवड केल्याचे जाहीर केले.

आपल्या मनोगतात पाटील यांनी आजपर्यंत केलेल्या सामाजिक कार्याला पक्षाचा व्यासपीठ मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आणि यापुढे हे कार्य अधिक जोमाने व समाजहितासाठीच करणार असल्याची ग्वाही दिली.

## अदानीने ऑफ-ग्रिड ग्रीन हायड्रोजन पायलट प्लांट केला सुरु

**अहमदाबाद : वृत्तसेवा**

अदानी न्यू इंडस्ट्रीज लिमिटेड (एएनआयएल) ने आज गुजरातमधील कच्छ येथे भारतातील पहिला ऑफ-ग्रिड ५ मेगावॉट क्षमतेचा ग्रीन हायड्रोजन पायलट प्लांट यशस्वीरित्या कार्यान्वित केल्याची घोषणा केली. हा प्रकल्प देशाच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. हा अत्याधुनिक प्लांट १००% सौर ऊर्जेवर आधारित असून बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टम सोबत एकत्रित केले गेले आहे. त्यामुळे हा प्रकल्प पूर्णपणे ऑफ-ग्रिड कार्यरत होऊ शकतो. हे विकेंद्रीकृत, नवीकरणीय ऊर्जेवर आधारित हायड्रोजन निर्मितीच्या नव्या युगाची सुरुवात आहे. एएनआयएल चा हा पायलट प्लांट भारतातील पहिलाच ऑफ-ग्रिड ५ मेगावॉट ग्रीन हायड्रोजन प्रकल्प आहे, ज्यामध्ये पूर्णपणे स्वयंचलित, क्लोज्ड-लूप इलेक्ट्रोलायझर प्रणाली बसवण्यात आली आहे.

ही प्रणाली प्रत्यक्ष सौर ऊर्जा पुरवठ्याच्या बदलत्या स्वरूपानुसार गतिशीलपणे प्रतिसाद देण्यासाठी तयार करण्यात आली आहे. यामुळे सौर ऊर्जेतील चढ-उतार सांभाळण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्यक्षम लवचिकता मिळते, तसेच कार्यक्षमतेसह सुरक्षितता आणि कामगिरीही सुनिश्चित केली जाते.

# पवारसाहेब साखर कामगारांच्या हिताचा निर्णय जाहीर करतील : आ.जयंतराव पाटील

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**

राज्यातील साखर कामगारांच्या पगार वाढीबाबत त्रिपक्षीय समितीच्या बैठका झाल्या. मात्र समितीत एक मत होऊ न शकल्याने हा विषय सहकार उद्योगाचे आधार स्तंभ,राष्ट्रीय नेते खा.शरदचंद्र पवारसाहेबां च्या एक सदस्यीय लवादाकडे दिला आहे. खा.शरदचंद्र पवारसाहेब राज्यातील साखर कामगारांच्या हिताचा योग्य निर्णय लवकरच जाहीर करतील,असा विश्वास माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी राजारामनगर येथे बोलताना व्यक्त केला.

महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे नूतन जनरल सेक्रेटरी राऊ पाटील (कोल्हापूर),कार्याध्यक्ष राजेंद्र चव्हाण (नवेखेड) यांच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. राजारामबापू पाटील सहकारी साखर कारखाना व वाळवा तालुका राष्ट्रीय साखर संघ (इंटक) च्या वतीने हा सत्कार करण्यात आला. राजारामबापू साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रतिकदादा



पाटील,उपाध्यक्ष विजय राव पाटील,प्रतिनिधी मंडळाचे उपाध्यक्ष प्रदीप शिंदे,खजिनदार प्रदीप बनगे,सचिव संजय बोरमळे,दिलीप भोरे,तानाजीराव खराडे,मोहनराव शिंदे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी लोकनेते राजारामबापू पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. आ.पाटील म्हणाले,राज्यातील साखर कामगार चळवळीत साथी किशोर पवार,बी. आर. पाटील,आर.बी.शिंदे,शंकरराव भोसले यांनी मोठे योगदान केलेले आहे. तोच विचार व वारसा पुढे नेत नूतन पदाधिकारी साखर कामगारांना न्याय मिळवून देतील. कामगारां नी नव्या तंत्रज्ञानाचा अंगीकार करून संस्थे च्या प्रगतीस हातभार लावावा,आपल्या कुटुंबास वेळ द्यावा. यावेळी त्यांनी अनेक जुन्या घटना-प्रसंगांना उजाळा दिला. प्रारंभी वाळवा तालुका राष्ट्रीय साखर कामगार संघाचे कार्याध्यक्ष तानाजीराव खराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.माजी जि.प.अध्यक्ष देवराज पाटील,संचालक विठ्ठलतात्या पाटील,कार्तिक पाटील, राजकुमार कांबळे,डॉ.सौ.योजना शिंदे-पाटील,कार्यकारी संचालक आर.डी.माहुली, कामगार प्रतिनिधी विकास पवार,खजिनदार सचिन कोकाटे,योगेश पवार यांच्यासह अधिकारी व कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कामगार प्रतिनिधी मनोहर सन्मुख यांनी आभार मानले. प्रसिध्दी अधिकारी विश्वनाथ पाटसुते यांनी सूत्रसंचालन केले.

## नाईट कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय ‘योग दिन’ साजरा



**सांगली : हॅलो प्रभात**


येथील लठ्ठे एज्युकेशन सोसायटीच्या नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेजमध्ये आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी वर्षारांनी कुंभार या प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांना बैठ्या आणि उभ्या योगासनाचे प्रात्यक्षिक करून दाखविले आणि प्रत्येक आसनाचे शरीराला होणारे फायदे विस्ताराने सांगितले. या उपक्रमाचे आयोजन शासकीय आदेशानुसार भक्ती योगाच्या माध्यमातून आणि प्राचार्य बी. व्ही. पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार प्रा. नागनाथ बनसोडे, प्रा.विद्याधर पाटील, डॉ.प्रिया टिळे यांनी केले. या उपक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक आणि प्रशासकीय सेवक उपस्थित होते. शेवटी डॉ. बाळासाहेब कोटलगी यांनी सर्वांचे आभार मानले

## ‘एमएसएमई कॉन्क्लेव्ह २०२५’चे आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतीय चार्टर्ड अकाउंटंट इन्स्टिट्यूटने भारताच्या अर्थव्यवस्थेच्या मायक्रो, लघु आणि मध्यम उपक्रम सबलीकरण करण्याच्या उद्देशाने एक रणनीतिक देशव्यापी उपक्रम सुरू केला आहे. या व्यवसायांना संघटित पद्धतीने सक्षम करण्यासाठीआणि त्यांच्या परिवर्तनाला चालना देण्यासाठी आयसीएआय २६-२७ जून रोजी मुंबईतील हॉटेल सहारा स्टार येथे 'एमएसएमई कॉन्क्लेव्ह २०२५' आयोजित करीत आहे, ज्यासह २७ जून रोजी देशभरात एक मोठा कार्यक्रम होईल.

## दमदार पावसामुळे चारा पाण्याचा प्रश्न मिटला



**दौंड : हॅलो प्रभात**

यंदा पुरेसा पाऊस न पडल्याने राज्यात टंचाईसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु परतीच्या पावसाने दमदार हजेरी लावल्याने ओढे नाले बंधारे पावसाच्या पाण्याने भरले असून ठिकठिकाणी पाणी झुळूझुळू पाणी वाहू लागले आहे. गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसाने मोठा दिलासा आहे. त्यामुळे सध्यातरी पाणी व चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास यामुळे निश्चितच मदत होणार आहे. शेतकऱ्यांना दूरवरून हिरवा चारा विकत आणावा लागत होता. परिसरातील शेतकऱ्यांच्या नजरा पावसाकडे लागल्या होत्या. दक्षिण पट्ट्यात सुरू झालेल्या पावसामुळे शेतकरी, मेंढपाळ बांधव या पावसामुळे सुखावला आहे. निसर्गाने अशीच साथ ठेवली तर नक्कीच पिण्याचे पाणी जनावरांचे चाऱ्याचा प्रश्न मार्गी लागेल.

## प्रथम फाउंडेशनचे विशेष उन्हाळी शिबिर यशस्वी



**पुणे : हॅलो प्रभात**

आपल्या प्रमुख सीएसआर उपक्रम 'पी अँड जी शिक्षाच्या' २० वर्षांच्या यशस्वी वाटचालीचा एक भाग म्हणून, टायड, विक्स, जिलेट यांसारख्या ब्रँड्सचा निर्माता असलेल्या पी अँड जी इंडियाने प्रथम एज्युकेशन फाउंडेशनसोबत भागीदारी करून रायगड, पुणे व सातारा जिल्ह्यातील वंचित मुलांसाठी कॉम्बाइंड ॲक्टिव्हिटीज फॉर मॅक्सिमाइझ्ड लर्निंग का कॅम्प' हे व्यापक आणि राष्ट्रीय स्तरावरील उन्हाळी शिक्षण शिबिर आयोजित केले. हे शिबिर मुलांनी उन्हाळी सुट्टीचा योग्य उपयोग करून समजून व सरळपणे वाचन करणे शिकावे, आपले विचार तोंडी आणि लेखी स्वरूपात मांडता यावेत, तसेच मजबूत विश्लेषणात्मक व गणिती कौशल्ये आत्मसात करावीत यासाठी आयोजित करण्यात आले होते.रायगड, पुणे आणि सातारा सहित संपूर्ण महाराष्ट्रात या कार्यक्रमासाठी सुमारे ५४००० युवक स्वयंसेवकांना एकत्रितपणे सहभागी करून घेतले गेले, ज्यांनी मिळून वंचित समुदायांतील ६.५ लाखांहून अधिक मुलांना शिकवले आणि उन्हाळ्याला एक वेगवान शिक्षणाचा हंगाम बनवले. हे शिबिर राज्य सरकार, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि महाविद्यालयांच्या मोठ्या सहकार्याने आयोजित करण्यात आले.

## पंकज दबडे यांच्या हाती ‘घड्याळ’

**विटा : हॅलो प्रभात**

गेले अनेक वर्षे भाजपमध्ये कार्यरत असलेले भाजपाचे सांगली जिल्हा सचिव आणि विट्यातील युवा नेते पंकज भैय्या दबडे यांनी आज आपल्या शेकडो समर्थकांसह मुंबई येथे राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा,उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला.त्यांची तत्काळ प्रभावाने खानापुर तालुका अध्यक्षपदी नेमणुक करण्यात आली.आज राष्ट्रवादीत प्रवेश केलेल्यांमध्ये पुर्वाश्रमीचे भाजपाचे नेते संदीप ठोंबरे,मुकेश आण्णा जगताप,प्रकाश भाऊ चौगुले,आबासो जाधव यांच्यासह कार्यकर्त्यांचा समावेश आहे.